# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ७] गुरुवार, एप्रिल २९, २०१०/वैशाख ९, शके १९३२ [पृष्ठे ८, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक १६**

**प्राधिकृत प्रकाशन**


**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

## अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.**—महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . | १-८ |


दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**"
दिनांक २९ एप्रिल २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

**महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) (क) कलमे १ ते ६ ही, **राजपत्रात** हा अधिनियम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

(ख) या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ती खेरीज करून, उर्वरित कलमे १ मे २०१० पासून अंमलात येतील.

प्रकरण दोन

## मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ याची सुधारणा.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, १९५८ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा उल्लेख "मोटार वाहन कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१ई) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५८ चा मुंबई ६५.

"(१फ) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, भाड्यादाखल किंवा मोबदल्यादाखल चालवण्यात येणाऱ्या आणि भाडे मीटर बसविलेल्या व सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्यासाठी राज्यात वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरासाठी ठेवण्यात येणाऱ्या (तिचाकीसह) सर्व मोटार वाहनांकरिता,—

(एक) जर त्याची नोंदणी महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकानंतर (यापुढे, या पोट-कलमात, ज्याचा निर्देश "उक्त दिनांक" असा करण्यात आला आहे) झालेली असेल तर दुसऱ्या अनुसूचीच्या भाग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी ; २०१० चा महा. १२.

(दोन) जर त्याची नोंदणी उक्त दिनांकापूर्वी अगोदरच झालेली असेल आणि पोट-कलम (१) अन्वये त्यांच्यावर अगोदरच कर भरण्यात आलेला असेल तर, दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी ;

(तीन) जर त्यांची नोंदणी प्रथम इतर कोणत्याही राज्यात झालेली असेल आणि त्यानंतर महाराष्ट्र राज्यात त्यांचे हस्तांतरण झाल्यावर उक्त दिनांकानंतर त्यांना नवीन नोंदणीचिन्ह नेमून देण्यात आले असेल तर दुसऱ्या राज्यामध्ये त्यांची प्रथम नोंदणी झाल्याचा महिना विचारात घेऊन दुसऱ्या अनुसूचीच्या भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांनी,

अशा वाहनांच्या हयातीकरिता एकाचवेळी द्यावयाचा कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल. ".

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**३.** मोटार वाहन कर अधिनियमाच्या कलम ४ च्या पोट-कलम (२) मध्ये,—

(क) "(१क), (१ड) किंवा (१ई)" या मजकुराऐवजी "(१क), (१ड), (१ई) किंवा (१फ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) (अ), (ब) आणि (क) या खंडांमधील "(१क), (१ड) आणि (१ई)" या मजकुराऐवजी "(१क), (१ड), (१ई) आणि (१फ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम ९ ची सुधारणा.

**४.** मोटार वाहन कर अधिनियमाच्या कलम ९ मध्ये,—

(क) पोट-कलम (६) मध्ये "(१क), (१ड) किंवा (१ई)" या मजकुराऐवजी "(१क), (१ड), (१ई) किंवा (१फ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (६अ) मध्ये "(१क), (१ड) किंवा, यथास्थिति (१ई)" या मजकुराऐवजी "(१क), (१ड), (१ई) किंवा, यथास्थिति, (१फ)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (७) मध्ये,—

(एक) " (१क), (१ड) किंवा, यथास्थिति (१ई) " या मजकुराऐवजी " (१क), (१ड), (१ई) किंवा, यथास्थिति, (१फ) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (अ) मध्ये, उप-खंड (एक) मधील, " (१क), (१ड) किंवा, यथास्थिति, (१ई) " या मजकुराऐवजी " (१क), (१ड), (१ई) किंवा, यथास्थिति, (१फ) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. मोटार वाहन कर अधिनियमाच्या कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) मधील खंड (क) च्या उप-खंड (तीन) मध्ये, " पोट-कलम (१क), (१ड) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१ई) " या मजकुराऐवजी " पोट-कलम (१क), (१ड), (१इ) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (१फ) " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या कलम १६ ची सुधारणा.

६. मोटार वाहन कर अधिनियमाच्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये,—

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ याच्या दुसऱ्या अनुसूचीची सुधारणा.

(क) शीर्षकामधील " (१क) व (१इ) " या मजकुराऐवजी " (१क), (१इ) व (१फ) " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) भाग एक मध्ये, नोंद २ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| " ३. भाड्यावर किंवा मोबदल्यावर वाहतूक करणारी भाडे मीटर बसविलेली आणि सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्यासाठी वापर करण्यात येत असलेली मोटार वाहने (तिचाकीसह). | पहिल्या अनुसूची अन्वये, खंड(अ) च्या उप-खंड (चार) मध्ये नमूद केलेल्या वाहनांच्या संबंधित वर्गासाठी देय असणाऱ्या कराच्या वार्षिक दराच्या ११ पट." ; |

(ग) भाग दोन मध्ये, " माल किंवा सामग्रीच्या वाहतुकीकरिता वापरण्यात येणारे " या मजकुरानंतर " किंवा भाड्यासाठी किंवा मोबदल्यासाठी सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारे व भाडे मीटर बसविलेले " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(घ) भाग तीन मध्ये, " माल किंवा सामग्रीच्या वाहतुकीकरिता वापरण्यात येणारे " या मजकुरानंतर " किंवा भाड्यासाठी किंवा मोबदल्यासाठी सहापेक्षा अधिक नसतील इतके उतारू वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारे व भाडे मीटर बसविलेले " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

प्रकरण तीन

## महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५ याची सुधारणा.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ यामध्ये कलम ७अ समाविष्ट करणे.

**७.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर अधिनियम, १९७५, याच्या कलम ७ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९७५ चा महा. १६.

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याच्या कलम २२ च्या तरतुदी आणि त्याखालील तयार करण्यात आलेल्या नियमांच्या विवक्षित तरतुदी लागू करणे.

" **७क.** हा अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, त्याबाबत, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या कलम २२ अन्वये लेखा परीक्षणाच्या संबंधातील तरतुदी, आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी जेथवर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे विवरण सादर करणे व इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे कर किंवा अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही रक्कम भरणे यासंबंधात लागू असतील तेथवर त्या, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात येतील.". २००५ चा महा ९.

प्रकरण चार

## महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७ याची सुधारणा.

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**८.** महाराष्ट्र ऐषआराम सेवांवरील कर अधिनियम, १९८७ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "ऐषआराम कर अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ च्या पोट-कलम २ मधील, खंड (अ) व (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येतील :— १९८७ चा महा. ४१.

| | |
|---|---|
| " (अ) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकार प्रतिदिन, प्रत्येक निवासी जागेसाठी सातशे पन्नास रुपयांहून अधिक नसेल त्याबाबतीत. | निरंक |
| (ब) हॉटेलातून पुरविण्यात येणाऱ्या ऐषआराम सेवांवरील आकार प्रतिदिन, प्रत्येक निवासी जागेसाठी सातशे पन्नास रुपयांहून अधिक असेल परंतु बाराशे रुपयांहून अधिक नसेल, त्याबाबतीत. | जमा रकमेच्या अशा उलाढालीच्या ४ टक्के.". |

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ यामध्ये कलम १२अ समाविष्ट करणे.

**९.** ऐषआराम कर अधिनियमाच्या कलम १२ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ खाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या विवक्षित तरतुदी लागू करणे.

" **१२अ.** हा अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, त्याबाबत, महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ च्या तरतुदींखाली तयार करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी जेथवर इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे विवरण सादर करणे व इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे कर किंवा अधिनियमान्वये देय असलेली कोणतीही रक्कम भरणे यासंबंधात लागू असतील तेथवर त्या, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ योग्य त्या फेरफारांसह लागू करण्यात येतील.". २००५ चा महा. ९.

प्रकरण पाच

## महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ याची सुधारणा

२००५ चा महा. ९.

**१०.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश "मूल्यवर्धित कर अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम १८ मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (च) नंतर, पुढील खंड जादा दाखल करण्यात येतील :— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम १८ ची सुधारणा.

"(छ) धंद्याच्या स्वरूपात कोणताही बदल करील, किंवा

(ज) बँकेच्या खात्यात कोणतेही बदल करील, ".

**११.** महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २० च्या पोट-कलम (४) मधील, खंड (ख) मध्ये, "संपल्यावर" या मजकुराऐवजी "संपण्यापूर्वी" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २० ची सुधारणा.

**१२.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २३ मधील, पोट-कलम (५) मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २३ ची सुधारणा.

(क) खंड (क) मध्ये, "कोणत्याही व्यापाऱ्याच्या किंवा व्यक्तीच्या संबंधात कलम ६४ अन्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "चुकविण्याचा प्रयत्न केलेला आहे, किंवा कोणताही दावा चुकीच्या पद्धतीने केलेला आहे अशी विहित प्राधिकाऱ्यांची खात्री झाली असेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

"या अधिनियमाअन्वये कोणतीही कार्यवाही करीत असताना, विक्रीच्या किंवा खरेदीच्या कोणत्याही व्यवहारात नोंद न करता, चुकीच्या पद्धतीने नोंद करून, कोणत्याही कालावधीच्या किंवा कालावधींच्या बाबतीत, कोणत्याही व्यापाऱ्याने किंवा व्यक्तीने कर चुकविला असेल किंवा चुकविण्याचा प्रयत्न केला असेल किंवा कर दायित्व योग्यरीत्या उघड केले नसेल किंवा वजावट अधिक असल्याचा दावा केला असल्याची विहित अधिकाऱ्याची खात्री झाली असेल" ;

(ख) खंड (घ) च्या परंतुकानंतर, खालील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

"**स्पष्टीकरण**.—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, "विहित प्राधिकारी", "उक्त प्राधिकारी", "असा प्राधिकारी" व "कोणताही प्राधिकारी" याचा अर्थ, आयुक्त, किंवा यथास्थिति, कलम १० अन्वये नियुक्त केलेले प्राधिकारी व आयुक्ताने याबाबतीत ज्यांना आपले अधिकार सोपविले आहेत असे इतर अधिकारी व व्यक्ती, असा असेल.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २९ ची सुधारणा.

**१३.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम २९ मध्ये,—

(क) पोट-कलम (६) मध्ये, "शंभर रुपये" या मजकुराऐवजी "एक हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (७) मध्ये, "एक हजार रुपये" या मजकुराऐवजी "पाच हजार रुपये" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (११) मध्ये, "पाच वर्षांनंतर" या मजकुराऐवजी "आठ वर्षांनंतर" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

**१४.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ४२ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल आणि ते १ एप्रिल २०१० पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

"(३क) राज्य शासन, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे,—

(क) जो सदनिका, निवासस्थाने किंवा इमारती किंवा जागा यांचे बांधकाम करण्याचे काम हाती घेत असेल व जमिनीच्या किंवा तलस्थित जमिनीच्या हितसंबंधित व्यक्तींबरोबर केलेल्या करारानुसार त्यांना ते हस्तांतरित करीत असेल अशा नोंदणीकृत व्यापाऱ्यांसाठी एका आपसमेळ योजनेची तरतूद करील ;

(ख) या अधिनियमान्वये असा नोंदणीकृत व्यापारी अशा कार्य कंत्राटांच्या अंमलबजावणीसाठी मालाच्या (मग तो मालाच्या स्वरूपातील असो किंवा अन्य कोणत्याही स्वरूपातील असो) हस्तांतरणावर देय असलेल्या कराच्या रकमेऐवजी आपसमेळाद्वारे कराचा दर विहित करील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

**१५.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ५१ मधील, पोट-कलम (१) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, आयुक्त, विहित केलेल्या शर्ती व निर्बंधांच्या अधीन राहून परतावा कमी करील व अशा अर्जावर मागितलेल्या परताव्याच्या काही भागाचाच परतावा करील.".

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६१ ची सुधारणा.

**१६.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ६१ मधील, पोट-कलम (१) मध्ये,—

(१) खंड (क) मध्ये, "चाळीस लाख रुपयांहून अधिक" या मजकुराऐवजी "साठ लाख रुपयांहून अधिक" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) खंड (ख) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ग) या अधिनियमान्वये किंवा, यथास्थिति, मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९ अन्वये देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनाच्या कोणत्याही पॅकेज योजनेच्या संबंधातील हक्कदार प्रमाणपत्र धारण करीत असेल तर, तो,". १९५९ चा मुंबई ५१.

**१७.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ८५ मधील, पोट-कलम (२) मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८५ ची सुधारणा.

(१) खंड (ख-२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :—

"(ख-३) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअन्वये व्यापाऱ्याकडून देय असलेल्या व्याजासंबंधात कलम ३० च्या पोट-कलम (२) किंवा (४) अन्वये दिलेला आदेश, किंवा

(ख-४) कलम ६३ च्या पोट-कलम (७) अन्वये देण्यात आलेल्या सूचना, किंवा";

(२) खंड (घ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(घ-१) कलम ३५ च्या पोट-कलमे (१) आणि (२) अन्वये दिलेला आदेश, किंवा".

**१८.** मूल्यवर्धित कर अधिनियमाच्या कलम ८६ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ख) मध्ये, "तसेच खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याचे नाव व पत्ता" या मजकुराऐवजी "तसेच खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्याचे नाव, पत्ता व नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ८६ ची सुधारणा.

**१९.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची क मध्ये,— सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची क ची सुधारणा.

(१) नोंद ४ मधील उप-नोंद (ग) मध्ये "डाळीचा कोंडा" या मजकुरानंतर "सरकी पेंड" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(२) विद्यमान नोंद ५५ ला, उप-नोंद (क) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या उप-नोंद (क) नंतर, पुढील उप-नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| "(ख) कापूर | निरंक % |
| (ग) लोबानसह धूप | निरंक %"; |

(३) नोंद ५६ नंतर, पुढील नोंदी जादा दाखल करण्यात येतील :—

| | |
|---|---|
| "५७ काथा (कॅटेच्यु) | निरंक % |
| ५८ मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये घटित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने प्रमाणित केलेल्या घटकांद्वारे तयार केलेला डिटर्जंट साबणा व्यतिरिक्त, घरगुती कपडे धुण्याचा साबण. | निरंक %.". |

१९६० चा मुंबई १९.

**२०.** मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ख मधील, नोंद ४ च्या स्तंभ (२) मध्ये, "कृत्रिम दागिने" या मजकुराऐवजी "हेअरपिन्स, कृत्रिम दागिने" हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची ख ची सुधारणा.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची ग ची सुधारणा.

२१. मूल्यवर्धित कर अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ग मध्ये,—

(१) शीर्षामधील, "४%" या मजकुरानंतर "किंवा ५%" हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(२) नोंद ३०, स्तंभ (२) मध्ये, "पेंडी" या मजकुराऐवजी "सरकी पेंडीखेरीज इतर पेंडी" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) नोंद ४४, स्तंभ (२) मध्ये, "काथा (कॅटेच्यु)" हा मजकूर वगळण्यात येईल ;

(४) नोंद ५१ वगळण्यात येईल ;

(५) नोंद ११४ नंतर, पुढील नोंद जादा दाखल करण्यात येईल :—

"११५ बॅटरीवर किंवा सौर ऊर्जेवर चालणारी वाहने ५ %".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक ११ ] शुक्रवार, जून ४, २०१०/ज्येष्ठ १४, शके १९३२ [ पृष्ठे १, किंमत : रुपये २६.००

असाधारण क्रमांक २१

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

## शुद्धिपत्र

**महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग चार, दिनांक २९ एप्रिल २०१० मध्ये, पृष्ठ क्रमांक १ ते ८ वर प्रकाशित करण्यात आलेल्या, महाराष्ट्र करविषयक कायदे (कर बसविणे व सुधारणा) अधिनियम, २०१० (सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२) मध्ये, पृष्ठ क्रमांक ३ वर,—

(१) ओळ क्रमांक ९ मध्ये, " (१इ) " या ऐवजी " (१ई) " असे वाचावे ;

(२) ओळ क्रमांक १२ मध्ये, दोन्ही ठिकाणी " (१इ) " या ऐवजी " (१ई) " असे वाचावे.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक १७ ]   गुरुवार, एप्रिल २९, २०१०/वैशाख ९, शके १९३२   [ पृष्ठे ८, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ३७

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Tax Laws (Levy and Amendment) Act, 2010 (Mah. Act No. XII of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XII OF 2010

*(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 29th April 2010.)*

An Act further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra.

WHEREAS it is expedient further to amend certain tax laws in operation in the State of Maharashtra, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Tax Laws (Levy and Amendment) Act, 2010.

(*2*) (*a*) Sections 1 to 6 shall come into force on the date of publication of this Act in the *Official Gazette*.

(*b*) Save as otherwise provided in this Act, the remaining sections shall come into force with effect from the 1st May 2010.

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.

Amendment of section 3 of Bom. LXV of 1958.

**2.** In section 3 of the Bombay Motor Vehicles Tax Act, 1958 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Motor Vehicles Tax Act "), after sub-section (*1E*), the following sub-section shall be inserted, namely :— Bom. LXV of 1958.

" (*1F*) Subject to the provisions of this Act, there shall be levied and collected on all motor vehicles (including tricycles) plying for hire or reward, fitted with fare meters and used or kept for use in the State for the carriage of not more than six passengers, a one time tax for the life time of such vehicles,—

(*i*) if registered after the date of commencement of the Maharashtra Tax Laws (Levy and Amendment) Act, 2010 (hereinafter, in this sub-section, referred to as " the said date "), at the rates specified in Part I of the Second Schedule ; Mah. XII of 2010.

(*ii*) if already registered before the said date and on which tax is already paid under sub-section (*1*), at the rates specified in Part II of the Second Schedule ;

(*iii*) if first registered in any other State and thereafter on transfer thereof in the State of Maharashtra, a new registration mark is assigned to the same after the said date, then having regard to the month of the first registration in the other State, at the rates specified in Part II of the Second Schedule. ".

Amendment of section 4 of Bom. LXV of 1958.

**3.** In section 4 of the Motor Vehicles Tax Act, in sub-section (*2*),—

(*a*) for the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*) or (*1E*) " the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*), (*1E*) or (*1F*) " shall be substituted ;

(*b*) in clauses (*a*), (*b*) and (*c*), for the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*) and (*1E*) " the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*), (*1E*) and (*1F*) " shall be substituted.

Amendment of section 9 of Bom. LXV of 1958.

**4.** In section 9 of the Motor Vehicles Tax Act,—

(*a*) in sub-section (*6*), for the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*) or (*1E*) " the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*), (*1E*) or (*1F*) " shall be substituted ;

(*b*) in sub-section (*6A*), for the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*) or (*1E*) " the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1D*), (*1E*) or (*1F*) " shall be substituted ;

(*c*) in sub-section (*7*),—

(*i*) for the brackets, figures, letters and words " (*1C*), (*1D*) or, as the case may be, (*1E*) " the brackets, figures, letters and words " (*1C*), (*1D*), (*1E*) or, as the case may be, (*1F*) " shall be substituted ;

(*ii*) in clause (*a*), in sub-clause (*i*), for the brackets, figures, letters and words " (*1C*), (*1D*) or, as the case may be, (*1E*) " the brackets, figures, letters and words " (*1C*), (*1D*), (*1E*) or, as the case may be, (*1F*) " shall be substituted.

Amendment of section 16 of Bom. LXV of 1958.

**5.** In section 16 of the Motor Vehicles Tax Act, in sub-section (*1*), in clasue (*c*), in sub-clause (*iii*), for the words, brackets, figures and letters " sub-section (*1C*) or, sub-section (*1D*) or as the case may be, sub-section (*1E*) " the following shall be substituted, namely :—

" sub-section (*1C*), (*1D*), (*1E*) or, as the case may be, sub-section (*1F*) ".

Amendment to SECOND SCHEDULE of Bom. LXV of 1958.

**6.** In the SECOND SCHEDULE appended to the Motor Vehicles Tax Act,—

(*a*) in the heading, for brackets, figures, letters and word " (*1C*) and (*1E*) " the brackets, figures, letters and word " (*1C*), (*1E*) and (*1F*) " shall be substituted ;

(*b*) in PART I, after entry 2, the following entry shall be added, namely :—

| | | |
|---|---|---|
| " 3. | Motor vehicles (including tricycles) plying for hire or reward, fitted with fare meters and used for carriage of not more than six passengers. | 11 times the annual rate of tax payable for the relevant class of the vehicles mentioned in sub-clause *IV* of clause A under the FIRST SCHEDULE. "; |

(*c*) in PART II, after the words " goods or materials " the words " or for carriage of not more than six passengers for hire or reward and fitted with fare meter " shall be inserted ;

(*d*) in PART III, after the words " goods or materials " the words " or for carriage of not more than six passengers for hire or reward and fitted with fare meter " shall be inserted.

## CHAPTER III

### AMENDMENT TO THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

Insertion of section 7A in Mah. XVI of 1975.

**7.** After section 7 of the Maharashtra State Tax on Professions, Trades, Callings and Employments Act, 1975, the following section shall be inserted, namely :— Mah. XVI of 1975.

Application of provisions of section 22 of Maharashtra Value Added Tax Act, 2002 and certain provisions of rules made thereunder.

"**7A.** Subject to the provisions of this Act and the rules made thereunder in this behalf, the provisions related to audit under section 22 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 and the provisions of the rules made thereunder, so far as they relate to the electronic filing of returns and electronic payment of tax, or any amount payable under this Act, shall *mutatis mutandis* apply for the purposes of this Act.". Mah. IX of 2005.

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA TAX ON LUXURIES ACT, 1987.

Amendment of section 3 of Mah. XLI of 1987.

**8.** In section 3 of the Maharashtra Tax on Luxuries Act, 1987 (hereinafter, in this Chapter, referred to as " the Luxuries Tax Act "), in sub-section (*2*), for clauses (*a*) and (*b*), the following clauses shall be substituted, namely :— Mah. XLI of 1987.

| | |
|---|---|
| " (*a*) Where the charge for luxury provided in a hotel is not exceeding rupees seven hundred and fifty per day, per residential accommodation. | Nil. |
| (*b*) Where the charge for luxury provided in a hotel exceeds rupees seven hundred and fifty but does not exceed rupees twelve hundred per day, per residential accommodation. | 4 *per centum* of such turnover of receipts.". |

Insertion of section 12A in Mah. XLI of 1987.

**9.** After section 12 of the Luxuries Tax Act, the following section shall be inserted, namely :—

Application of certain provisions of rules made under Maharashtra Value Added Tax Act, 2002.

" **12A.** Subject to the provisions of this Act and the rules made thereunder in this behalf, the provisions of the rules made under the provisions of the Maharashtra Value Added Tax Act, 2002, so far as they relate to the electronic filing of returns or electronic payment of tax or any amount payable under this Act, shall *mutatis mutandis* apply for the purposes of this Act. ". Mah. IX of 2005.

## CHAPTER V

### AMENDMENTS TO THE MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

Mah. IX of 2005. **10.** In section 18 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (hereinafter, in this Chapter, referred to as "the Value Added Tax Act"), in sub-section (*1*), after clause (*f*), the following clauses shall be added, namely :— Amendment of section 18 of Mah. IX of 2005.

"(*g*) undertakes any change in the nature of buisness, or

(*h*) effects any changes in the Bank account,".

**11.** In section 20 of the Value Added Tax Act, in sub-section (*4*), in clause (*b*), for the word "after" the word "before" shall be substituted. Amendment of section 20 of Mah. IX of 2005.

**12.** In section 23 of the Value Added Tax Act, in sub-section (*5*), — Amendment of section 23 of Mah. IX of 2005

(*a*) in clause (*a*), for the portion beginning with the words "During the course" and ending with the words "to be evaded" the following portion shall be substituted, namely :—

"During the course of any proceedings under this Act, if the prescribed authority is satisfied that the tax has been evaded or sought to be evaded or the tax liability has not been disclosed correctly or excess set-off has been claimed by any dealer or person";

(*b*) in clause (*d*), after the proviso, the following *Explanation* shall be added, namely :—

"*Explanation.*—For the purposes of this sub-section, "prescribed authority", "the said authority", "such authority" and "any authority" shall mean the Commissioner or, as the case may be, the authorities appointed under section 10 and other officers or persons to whom the Commissioner has delegated his powers in this behalf.".

**13.** In section 29 of the Value Added Tax Act,— Amendment of section 29 of Mah. IX of 2005.

(*a*) in sub-section (*6*), for the words "one hundred rupees" the words "one thousand rupees" shall be substituted ;

(*b*) in sub-section (*7*), for the words "one thousand rupees" the words "five thousand rupees" shall be substituted ;

(*c*) in sub-section (*11*), for the words "five years" the words "eight years" shall be substituted.

Amendment of section 42 of Mah. IX of 2005.

**14.** In section 42 of the Value Added Tax Act, after sub-section (*3*), the following sub-section shall be inserted and shall be deemed to have been inserted with effect from the 1st April 2010, namely :—

"(*3A*) The State Government may, by notification published in the *Official Gazette*,—

(*a*) provide a scheme of composition for the registered dealers who undertake the construction of flats, dwellings or buildings or premises and transfer them in pursuance of an agreement along with the land or interest underlying the land ;

(*b*) prescribe the rate of tax by way of composition, in lieu of the amount of tax payable on the transfer of goods (whether as goods or in some other form), in the execution of such works contracts by such registered dealer under this Act. ".

Amendment of section 51 of Mah. IX of 2005.

**15.** In section 51 of the Value Added Tax Act, to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, the Commissioner may, subject to such conditions and restrictions as may be prescribed, reduce the refund and grant only part of the refund claimed in such application. ".

Amendment of section 61 of Mah. IX of 2005.

**16.** In section 61 of the Value Added Tax Act, in sub-section (*1*),—

(*1*) in clause (*a*), for the words " exceed or exceeds rupees forty lakh " the words " exceeds rupees sixty lakh " shall be substituted ;

(*2*) after clause (*b*), the following clause shall be inserted, namely :—

"(*c*) if he holds an Entitlement Certificate in respect of any Package Scheme of incentives, granted under this Act or, as the case may be, under the Bombay Sales Tax Act, 1959, ". Bom. LI of 1959.

Amendment of section 85 of Mah. IX of 2005.

**17.** In section 85 of the Value Added Tax Act, in sub-section (*2*),—

(*1*) after clause (*b-2*), the following clauses shall be inserted, namely :—

"(*b-3*) an order passed under sub-section (*2*) or (*4*) of section 30 regarding the interest payable by the dealer under any provision of this Act, or

(*b-4*) an intimation issued under sub-section (*7*) of section 63, or " ;

(*2*) after clause (*d*), the following clause shall be inserted, namely :—

"(*d-1*) the order passed under sub-sections (*1*) and (*2*) of section 35, or ".

18. In section 86 of the Value Added Tax Act, in sub-section (2), in clause (*b*), for the words "as well as the name and address of the purchasing dealer" the words "as well as the name, address and the registration certificate number of the purchasing dealer" shall be substituted.

Amendment of section 86 of Mah. IX of 2005.

19. In SCHEDULE A appended to the Value Added Tax Act,—

Amendment to SCHEDULE A of Mah. IX of 2005.

(*1*) in entry 4, in sub-entry (*c*), after the word "pulses," the words "*sarki pend*," shall be inserted :

(*2*) the existing entry 55 shall be re-numbered as sub-entry (*a*) thereof; and after sub-entry (*a*) as so re-numbered, the following sub-entries shall be added, namely :—

| | |
|---|---|
| "(*b*) Camphor | Nil % |
| (*c*) Dhoop including Loban | Nil %"; |

(*3*) after entry 56, the following entries shall be added, namely :—

| | |
|---|---|
| "57 Kátha (catechu) | Nil % |
| 58 Handmade Laundry Soap manufactured by units certified by the Maharashtra State Khadi and Village Industries Board constituted under the Bombay Khadi and Village Industries Act, 1960, but excluding detergent. | Nil %". |

Bom. XIX of 1960.

20. In SCHEDULE B appended to the Value Added Tax Act, in entry 4, in column (2), for the words "Imitation Jwellery" the words "Hairpins, Imitation Jwellery" shall be substituted.

Amendment to SCHEDULE B of Mah. IX of 2005.

21. In SCHEDULE C appended to the Value Added Tax Act,—

Amendment to SCHEDULE C of Mah. IX of 2005.

(*1*) in the heading, after the figure and sign "4%" the word, figure and sign "or 5%" shall be added ;

(*2*) in entry 30, in column (2), for the words "oil cakes" the words "oil cakes excluding *sarki pend*" shall be substituted ;

(*3*) in entry 44, in column (2), the words and brackets "katha (catechu)," shall be deleted ;

(*4*) entry 51 shall be deleted ;

(*5*) after entry 114, the following entry shall be added, namely :—

"115 Vehicles operated on Battery or Solar power. 5%".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING STATIONERY AND PUBLICATION PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI. PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.